४००१५

मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१ची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्वे.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एमव्हीआर-०३२१/प्र.क्र.४१/परि-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ जानेवारी २०२३.

**वाचा : - केंद्र शासनाच्या दि.२३.०९.२०२१ व दि. १३.०९.२०२२ रोजी मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१.**

**प्रस्तावना :**

राज्यातील वाहनांचे प्रदूषण कमी करणे, रस्त्यावरील प्रवासी तसेच वाहनांच्या सुरक्षिततेमध्ये वाढ करणे, वाहनांची इंधन कार्यक्षमता सुधारणे, वाहनांवरील देखभाल खर्च कमी करणे तसेच जुन्या वाहनांच्या बदल्यात नवीन वाहने वापरात आणणे व त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये गुणात्मक सुधारणा होण्यासाठी केंद्र शासनाने मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१ प्रसिध्द केले असून त्यांची अंमलबजावणी करण्याची बाब परिवहन विभागाकडे सोपविण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक २०.१२.२०२२ रोजी सदर प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या विचारार्थ सादर केला असता त्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. तद्नुषंगाने धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे (Operational guidelines for setting up of Registered Vehicle Scrapping Facility) परिवहन विभागाकडून निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१ राज्यात राबविण्यात येत आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी परिचालनीय मार्गदर्शक सूचना (Operational guidelines for setting up of Registered Vehicle Scrapping Facility) यासोबत निर्गमित करण्यात येत आहेत. (सोबत Annexure-A व परिशिष्ट-अ )

२. सदर मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही परिवहन आयुक्त कार्यालयाने तात्काळ करावी.

३. महाराष्ट्र वाहन स्क्रॅपिंग सुविधा धोरणासाठी मार्गदर्शक सूचना व कार्यपध्दतीबाबतचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०११८१५२००७९९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhikan Onkar Thakur

**( भि. ओं. ठाकूर )**
**कार्यासन अधिकारी, गृह विभाग**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. मंत्री उद्योग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. मंत्री उर्जा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७. मा. मंत्री, कौशल्य व उद्योजगता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. मा. सभापती, विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
९. मा. अध्यक्ष, विधान सभा, यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
१०. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
११. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१२. सर्व विधान मंडळ सदस्य, विधान भवन, मुंबई.
१३. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. अपर मुख्य सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१५. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६. प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१७. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१८. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१९. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२०. प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२१. सचिव, वित्त (व्यय) विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. २३.
२२. सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२३. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.

७. प्रत्येक नोंदणीकृत वाहने निष्कासन सुविधेमध्ये प्रत्येक वाहनाच्या प्रारूप व वर्षातील वयानुसार किमान मूल्य आपल्या संकेतस्थळावर प्रदर्शित करेल व त्याची जोडणी महाराष्ट्र परिवहन विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

तसेच निष्कासित वाहनाचे मूल्य हे नोंदणीकृत वाहन निष्कासन सुविधा व वाहनाचे नोंदणीकृत मालक किंवा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधीच्या दरम्यान वाटाघाटी होऊन सहमती झालेले मूल्य असेल.

८. एखाद्या विशिष्ट जिल्हा / महसुली विभागात नोंदणी झालेल्या वाहनांच्या संख्येचा विचार करून राज्य शासन महाराष्ट्र राज्यातील विशिष्ट जिल्हा / महसुली विभागात नोंदणीकृत वाहन निष्कासन सुविधांची संख्येवर निर्बंध घालण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.

**ब) वाहन निष्कासन व निर्नोंदणीकरणाची प्रक्रिया :**

१. दिनांक २३ सप्टेंबर २०२१ व दिनांक १३ सप्टेंबर २०२२ रोजीच्या सर्वसामान्य सुरक्षा नियमावली नुसार महाराष्ट्रात स्थापित नोंदणीकृत वाहन निष्कासन सुविधेने कोणत्याही राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशात नोंदणी झालेली वाहने निष्कासित करण्यासाठी स्वीकारावीत. मात्र महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेल्या सवलती व लाभ घेण्यासाठी सदर नोंदणीकृत वाहन निष्कासन सुविधेने खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे :

अ) निष्कासन करण्यासाठी सादर करण्यात आलेले वाहन हे उपरोक्त नमूद शासन निर्णयातील अधिसूचित अटींचे पालन करणारे असावे.

ब) महाराष्ट्र शासनाकडे नोंदणी झालेल्या नोंदणीकृत वाहन निष्कासन सुविधेने वाहन सादर झाल्याचे प्रमाणपत्र जारी करणे आवश्यक आहे.

२. शासकीय वाहने : शासकीय मालकीच्या सर्व वाहनांचा इ – लिलाव हा धातू भंगार व्यापार महामंडळाच्या (Metal Scrap Trade Corporation Ltd.) संस्थळाच्या मार्फत करण्याचे निर्देश भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने त्यांच्या दिनांक १७ डिसेंबर २०२२ रोजीच्या पत्राद्वारे दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र शासनच्या मालकीच्या (राज्य शासन, स्थानिक संस्था, स्थानिक स्वशासित संस्था इत्यादी) १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांचा ई- लिलाव धातू भंगार व्यापार महामंडळाच्या संस्थळाच्या मार्फतच होईल. महाराष्ट्र राज्यात नोंदणी झालेल्या नोंदणीकृत वाहन निष्कासन

सुविधेमार्फत होणे आवश्यक आहे. सदर सर्व निष्कासित झालेल्या वाहनांचे पोटी ( महाराष्ट्र स्वयंचलित वाहने कर अधिनियम १९५८ व महाराष्ट्र मोटार ( प्रवासी कर ) अधिनियम १९५८ नुसार ) शास्ती व ( मोटार वाहन अधिनियम १९८८ नुसार ) दंड वसूल केल्यानंतर उर्वरित निष्कासन मूल्य हे मोटार वाहन विभाग – 800, Other Receipts (00)(00) (01) Other Receipts (00410041) मध्ये जमा करण्यात येईल.

३. ज्या वाहनांचे आयुष्य संपले असूनही ती सार्वजनिक ठिकाणी फिरत किंवा सोडून दिले असल्याचे आढळल्यास किंवा अंमलबजावणी / शासकीय अभिकरणाने जप्त केलेली वाहने त्यांच्या नोंदणीकृत मालकाला न सोपविता अंमलबजावणी अभिकरणाने महाराष्ट्र राज्याच्या परिवहन खात्याकडे नोंदणी झालेल्या अधिकृत नोंदणीकृत वाहन, निष्कासकाच्या ताब्यात दिल्या पाहिजेत.

अ ) महाराष्ट्र स्वयंचलित वाहन कर अधिनियम १९५८ व महाराष्ट्र स्वयंचलित वाहन ( प्रवासी कर ) अधिनियम १९५८ व स्वयंचलित वाहन अधिनियम १९८८ नुसार कोणतीही दंडाची किंवा कराची रक्कम सदर वाहनाकडून देय नसल्याची खातरजमा झाल्यावर निष्कासित वाहनाच्या निष्कासन मूल्याची रक्कम मिळण्यास नोंदणीकृत मालक पात्र असेल.

ब ) नोंदणीकृत मालकाने वाहनावर दावा न केल्यास किंवा मालक शोधण्यायोग्य नसल्याचे घोषित झाल्यास सदर वाहनापोटी महाराष्ट्र राज्यात नोंदणी झालेल्या वाहन निष्कासन सुविधेमार्फत होणे आवश्यक आहे. सदर सर्व निष्कासित झालेल्या वाहनांचे पोटी (महाराष्ट्र स्वयंचलित वाहने कर अधिनियम १९५८ व महाराष्ट्र मोटार ( प्रवासी कर ) अधिनियम १९५८ नुसार ) शास्ती व ( मोटार वाहन अधिनियम १९८८ नुसार) दंड वसूल केल्यानंतर उर्वरित निष्कासन मूल्य हे मोटार वाहन विभाग –102, Receipts under State Motor Vehicle Taxation Act (01) Receipts under State Motor Vehicle Taxation Act, (01)(01) State Motor Vehicle TGaxation Act, (00410097) मध्ये जमा करण्यात येईल.

४. शिवाय असे की मोटार वाहन करातून सूट प्राप्त शासकीय वाहनांचे व ( केंद्र / राज्य शासनाने ) लिलाव केलेल्या अधिकार दावित न केलेल्या वाहनांचे जमा प्रमाणपत्र व्यापारयोग्य असणार नाही व

मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम,२०२१ ची अंमलबजावणी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह (परिवहन) विभाग
शासन निर्णय क्रमांक- एमव्हीआर-०५२२/प्र.क्र.४१/भाग-१/परि-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २७ जानेवारी,२०२३

वाचा :- १) केंद्र शासनाच्या दि.२३.०९.२०२१ व दि.१३.०९.२०२२ रोजी मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र.F.No.४४(१)/PF-S/२०२२-२३ (CAPEX), दि.१६.१२.२०२२.
३) केंद्र शासनाचे मा.सचिव (परिवहन) व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित केलेले पत्र क्र.RT-२३०१३/८/२०२२-T, दि.१७.१२.२०२२.

**प्रस्तावना :-**

राज्यातील वाहनांचे प्रदूषण कमी करणे, रस्त्यावरील प्रवासी तसेच वाहनांच्या सुरक्षिततेमध्ये वाढ करणे, वाहनांची इंधन कार्यक्षमता सुधारणे, वाहनांवरील देखभाल खर्च कमी करणे तसेच जुन्या वाहनांच्या बदल्यात नवीन वाहने वापरात आणणे व त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये गुणात्मक सुधारणा होण्यासाठी केंद्र शासनाने मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१ प्रसिध्द केले असून तद्नुषंगाने धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे (Operational guidelines for setting up of Registered Vehicle Scrapping Facility) निर्ममित करण्यात आली आहेत. याबाबत राज्यातील शासकीय, निम-शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम यांचे अधिनस्त कार्यालयातील नोंदणी दिनांकापासून १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने निष्कासित (Scrap) करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१ राज्यात राबविण्यात येत आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या दि.१६.१२.२०२२ व दि.१७.१२.२०२२ च्या पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील शासकीय, निम-शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम यांचे अधिनस्त कार्यालयातील नोंदणी दिनांकापासून सदर शासन निर्णयाच्या

दिनांकापर्यंत १५ वर्ष किंवा १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने Registered Vehicle Scrapping Facility मार्फत निष्कासित (Scrap) करण्यात यावीत व सदरची कार्यवाही केंद्र शासनाच्या दि.१७.१२.२०२२ रोजीच्या पत्राप्रमाणे करण्यात यावी.

२. जी शासकीय वाहने १५ वर्षापेक्षा जास्त वयाची आहेत व ज्यांचे निर्लेखन करण्यात आले नाही, परंतु ती आज अखेर वापरात आहेत अशी वाहने निष्कासित केल्यानंतर त्या वाहनांच्या बदल्यात संबंधित विभागास प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करुन नवीन वाहने खरेदी / भाडे तत्वावर घेता येतील.

३. मोटार वाहन विभागाच्या संगणकीय अभिलेखानुसार शासनाची एकूण ४६३१ इतकी वाहने १५ वर्षे पेक्षा जास्त वयाची आहेत. सदर वाहने संबंधित विभागांनी दि.३० जून, २०२४ पर्यंत Registered Vehicle Scrapping Facility मार्फत निष्कासित (Scrap) करावीत.

४ सदर अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही परिवहन आयुक्त कार्यालयाने तात्काळ करावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या विनियम कार्यासनाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२७/२०२३/विनियम, दि.१८.०१.२०२३ व साधनसंपत्ती कार्यासनाचा अनौपचारिक संदर्भ क्र.५/सासं, दि.२४.०१.२०२३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०१२७१४५४४४२४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhikan Onkar
Thakur

(भि. ओं. ठाकूर)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री याचे अपर मुख्य सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा.मंत्री, मंत्रालय, मुंबई.